# समर्थन

## खर्चाचे पूरक विवरणपत्र विश्लेषण

### विभाग निहाय

## जुलै, २०१६

### (महाराष्ट्र राज्य)

**समर्थन**

११५, धुरी कॉमर्स प्लाझा, वसई रोड स्थानकासमोर,
वसई (पू), पालघर -४०१ २०८ ✆ ०२५०-२३९०१०३/४
**विश्लेषक : रुपेश किर : ९८९२९३९६१७/७३८७२७०५३३**
✉: samarthanmumbai97@gmail.com
www.samarthanadvocacy.org

# पावसाळी अधिवेशन - जुलै २०१६

## <u>खर्चाचे पूरक विवरणपत्र २०१६-१७</u>

**ठळक वैशिष्टे:**

- जुलै, २०१६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात एकूण रु.१३ हजार ३२ कोटी २१ लाख १५ हजारांच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आलेल्या आहेत. मुळ अर्थसंकल्पाच्या तुलनेत पूरक मागणीचे प्रमाण ४.८१ टक्के आहे.
- मार्च २०१६ मध्ये शासनाने सादर केलेला अर्थसंकल्प (मुळ मागणी) रु. २ लाख ७० हजार ७६३ कोटींचा होता. जुलै, २०१६ मध्ये सादर केलेल्या पूरक मागण्या मिळून रु. २ लाख ८३ हजार ७९६ कोटी १४ लाख झाला आहे.
- कृषि व पदुम, नगर विकास, गृह निर्माण, सार्वजनिक आरोग्य, पर्यावरण, उद्योग उर्जा व कामगार, अन्न व नागरी पुरवठा, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, आदिवासी विकास, महिला व बाल विकास विभाग या १० विभागांच्या रु.६ हजार ४३५ कोटी ६८ लाखांच्या (४९.३८%) पुरवणी मागण्यांवर चर्चा होणार असून १७ विभागांच्या रु. ६ हजार ५९६ कोटी ५३ (लाखांच्या ५०.६२%) मागण्या विनाचर्चा मंजूर होतील.
- **<u>(आकस्मिकता निधीतून रु. ७६ कोटी ३९ लाख काढण्यात आले असून सर्वात जास्त रु. ५५ कोटींची रक्कम गृह विभागांतर्गत काढण्यात आली आहे. ही रक्कम 'गुन्हा व गुन्हेगारीचा माग काढण्यासाठी नेटवर्क उभे करण्यासाठी' काढण्यात आली असून या मागणीचा समावेश मुळ अर्थसंकल्पात करणे शक्य होते.)</u>**
- जुलै पुरवणी मागण्यांमध्ये एकूण २७ विभागांच्या ८३ मागण्या असून त्यात २४३ बाबी अंतर्भूत आहेत.
- जुलै, २०१६ मध्ये सादर केलेल्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रात आकस्मिकता निधीतून ६ बाबींअंतर्गत काढण्यात आलेली रक्कम रु. ७६ कोटी ३९ लाख ५९ हजार आहे, जी पुरवणी मागणीच्या तुलनेत ०.५८ टक्के इतकी आहे.

✍ खर्चाचे पूरक विवरणपत्र जुलै, २०१६ मध्ये रु. १३ हजार ३२ कोटी २१ लाखांच्या पूरक मागण्या सादर केलेल्या २७ विभागांपैकी १) गृहनिर्माण, २) सार्वजनिक आरोग्य, ३) कृषि व पदुम, ४) महिला व बाल विकास, ५) शालेय शिक्षण या ५ विभागांनी सर्वात जास्त रु. ६ हजार ८४२ कोटी २२ लाखांच्या पूरक मागण्या सादर केल्या असून त्यांचे एकूण पूरक मागणीत प्रमाण ५२.५० टक्के आहे.

✍ वर्ष २०१४-१५ मध्ये जून, २०१४ मध्ये २० हजार ३३८ कोटी २ लाख रुपयांची पूरक मागणी करण्यात आली होती. तर वर्ष २०१५-१६ जुलै, २०१५ मध्ये १४ हजार ७९३ कोटी ६ लाख रुपयांची पूरक मागणी करण्यात आली होती. वर्ष २०१६-१७ च्या जुलै अधिवेशनात मध्ये १३ हजार ३२ कोटी २१ लाख रुपयांची पूरक मागणी करण्यात आली आहे.

## जुलै, २०१५ च्या महसुली व भांडवली पुरवणी मागण्या

*तक्ता क्र. १* *( रु. कोटीत )*

| मागण्यांचा प्रकार | भारित | दत्तमत | एकूण |
|---|---|---|---|
| महसुली | ११.३९ | ११,३९२.२९ | ११,४०३.६९ |
| भांडवली | - | १,६२८.५२ | १,६२८.५२ |
| एकूण | ११.३९ | १३,०२०.८१ | १३,०३२.२१ |

*स्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र, जुलै २०१६*

✍ जुलै २०१६ मध्ये वर्ष २०१६-१७ साठी रु. १३ हजार ३२ कोटी २१ लाखांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या आहेत, यामध्ये दत्तमत स्वरुपाच्या रु. १३ हजार २० कोटी ८१ (९९.९२ टक्के) लाखांच्या पुरवणी मागण्या आहेत. तर भारित स्वरुपाच्या रु. ११ कोटी ३९ (०.०८ टक्के) लाखांच्या पुरवणी मागण्यांचा समावेश आहे.

## मुळ मागणीच्या तुलनेत जुलै पुरवणी मागणीचे प्रमाण ४.५९ टक्के

*तक्ता क्र. २* *(रुपये कोटीत)*

| मागण्या | रक्कम | एकूण मागणीशी प्रमाण |
|---|---|---|
| मार्च, २०१६ मूळ मागणी | २,७०,७६३.९३ | ९५.४१ |
| जुलै, २०१६ पूरक मागणी | १३,०३२.२१ | ४.५९ |
| एकूण मागणी | २,८३,७९६.१४ | १००.०० |

*स्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र, जुलै २०१६*

✍ राज्याचा एकूण अर्थसंकल्प (मुळ मागणी) रु. २ लाख ७० हजार ७६३ कोटी ९३ लाख एवढा होता. जुलै, २०१६ मध्ये सादर केलेल्या पूरक मागण्या मिळून रु. २ लाख ८३ हजार ७९६ कोटी १४ लाख झाला आहे.

## सर्वाधिक पुरवणी मागण्या केलेले विभाग

*तक्ता क्र. ३* *(रु. कोटीत)*

| विभाग व विभागांची संख्या | पुरवणी मागण्यांची संख्या | पुरवणी मागणी | मुळ मागणी | पुरवणी मागणीचे मुळ मागणीशी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| गृहनिर्माण | १ | १७५०.३६ | ३६९.२१ | ४७४.०० |
| सार्वजनिक आरोग्य | १ | १४६६.४५ | ६९१२.३८ | २१.२१ |
| कृषि व पदुम | ३ | १३४४.३२ | ७६८५.६८ | १७.४९ |
| महिला व बाल | १ | ११९४.८१ | १३४३.८७ | ८८.९० |
| शालेय शिक्षण | ३ | १०८६.२४ | ४०१४६.८९ | २.७० |
| ५ | ९ | ६८४२.२२ | ५६४५८.०३ | १२.११ |

*स्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र, जुलै २०१६ व विभागांचे खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज-भाग–२*

✍ खर्चाचे पूरक विवरणपत्र जुलै, २०१६ मध्ये रु. १३ हजार ३२ कोटी २१ लाखांच्या पूरक मागण्या सादर केलेल्या २७ विभागांपैकी १) गृहनिर्माण, २)सार्वजनिक आरोग्य, ३)कृषि व पदुम, ४)महिला व बाल विकास, ५) शालेय शिक्षण या ५ विभागांनी रु. ६ हजार ८४२ कोटी २२ लाखांच्या पूरक मागण्या सादर केल्या असून त्यांचे प्रमाण ५२.५० टक्के आहे.

✍ गृहनिर्माण या विभागाने सर्वाधिक रु.१ हजार ७५० कोटी ३६ लाखाची पुरवणी मागणी केली असून एकूण पुरवणी मागणीत त्याचे प्रमाण १३.४३ टक्के आहे.

✍ गृहनिर्माण या विभागाने नागरी क्षेत्रामध्ये ‘सर्वांसाठी घरे’ या योजनेसाठी रु. १ हजार ७५० कोटी पूरक मागणीद्वारे उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

# आकस्मिकता निधीतून काढलेले ७६ कोटी ३९ लाख

## त्यापैकी गृह विभागाचा वाटा ५५ कोटी

*तक्ता. क्र. ४* *(रु. कोटीत)*

| विभाग | बाब क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|---|
| **गृह** | १४ | गुन्हा व गुन्हेगारीचा माग काढण्यासाठी नेटवर्क यंत्रणा उभारणे. | ५५.०४ |
| **महसूल व वन** | २८ | शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी उपाययोजना करणे. | १०.०० |
| **सार्वजनिक बांधकाम** | ७४ | राज्यात न्यायिक अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या इमारतींमधील लहान बांधकामे यासाठी तरतूद करणे. | १.०५ |
| **सार्वजनिक बांधकाम** | ७६ | राज्यातील न्यायालयांच्या इमारतीमधील लहान बांधकामांसाठी तरतूद | २.१० |
| **विधि व न्याय** | ११४ | राज्यातील दुय्यम न्यायालयांच्या कर्मचाऱ्यांचा वास्तववादी आढावा घेण्यासाठी नेमलेल्या अभ्यासगटासाठी खर्च करणे. | ०.२० |
| **विधि व न्याय** | १२१ | शिर्डी येथील १०१ दुकानदारांना न्यायालयाच्या आदेशानुसार नुकसानभरपाई देण्यासाठी तरतूद करणे. | ८.०० |
| | | **एकूण** | **७६.३९** |

*स्त्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र, जुलै २०१६*

- **वर्ष २०१६-१७ साठी अर्थसंकल्पीय अधिवेशनात एकूण रु. १३ हजार ३२ कोटी २१ लाखांच्या पुरवणी मागण्या करण्यात आल्या आहेत त्यापैकी आकस्मिकता निधीतून ४ विभागाअंतर्गत रु. ७६ कोटी ३९ लाख काढण्यात आले आहेत. एकूण पुरवणी मागण्यांमध्ये याचे प्रमाण ०.५८ टक्के आहे.**

- **आकस्मिकता निधीतून सर्वात जास्त रु. ५५ कोटींची रक्कम गृह विभागांतर्गत काढण्यात आली आहे. ही रक्कम गुन्हा व गुन्हेगारीचा माग काढण्यासाठी नेटवर्क उभे करण्यासाठी काढण्यात आली असून या मागणीचा समावेश मुळ अर्थसंकल्पात करणे शक्य होते.**

## दोन दिवसात रु. ६ हजार ४३५ कोटी ६८ लाखांच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा!

**तर रु. ६ हजार ५९६ कोटी ५३ लाखांच्या मागण्या विनाचर्चा मंजूर होणार**

*तक्ता. क्र. ५* *(रु. कोटीत)*

| विभाग व विभागांची संख्या | पुरवणी मागण्यांची संख्या | पुरवणी मागणी | मूळ मागणी | पुरवणी मागणीचे मूळ मागणीशी % |
|---|---|---|---|---|
| **२५ जुलै, २०१६** | | | | |
| कृषि व पदुम | ३ | १३४४.३२ | ७६८५.६८ | १७.४९ |
| नगर विकास | ३ | २८८.७५ | १७७६२.१३ | १.६२ |
| गृह निर्माण | १ | १७५०.३६ | ३६९.२१ | ४७४.०८ |
| सार्वजनिक आरोग्य | १ | १४६६.४५ | ६९१२.३८ | २१.२१ |
| पर्यावरण | १ | २०.०० | २४.३८ | ८२.०३ |
| **२६ जुलै, २०१६** | | | | |
| उद्योग उर्जा व कामगार | ५ | १७६.१५ | ९८४०.१९ | १.७९ |
| अन्न व नागरी पुरवठा | १ | १७.५३ | ६२४६.८५ | ०.२८ |
| सामा. न्याय व विशेष सहाय्य | १ | ३९.१३ | १२२०२.४४ | ०.३२ |
| आदिवासी विकास | २ | १३८.१८ | ७६४३.६९ | १.८० |
| महिला व बाल विकास | १ | ११९४.८१ | १३४३.८७ | ८८.९० |
| **एकूण** | **१९** | **६४३५.६८** | **७००३०.८२** | **९.१८** |

*स्त्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र, जुलै २०१६ व विभागांचे खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज-भाग–२*

- कृषि व पदुम, नगर विकास, गृह निर्माण, सार्वजनिक आरोग्य, पर्यावरण, उद्योग उर्जा व कामगार, अन्न व नागरी पुरवठा, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, आदिवासी विकास, महिला व बाल विकास विभाग या १० विभागांच्या रु.६ हजार ४३५ कोटी ६८ (४९.३८%) लाखांच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा होणार असून *१७ विभागांच्या रु. ६ हजार ५९६ कोटी ५३ (५०.६२%) लाखांच्या मागण्या विनाचर्चा मंजूर होतील.*

- गृहनिर्माण या विभागाची एकूण पुरवणी मागणी रु. १ हजार ७५० कोटी ३६ लाख रुपयांची असून नागरी क्षेत्रामध्ये ‘सर्वांसाठी घरे’ या योजनेसाठी रु. १ हजार ७५० कोटी पूरक मागणीद्वारे उपलब्ध करून देण्यात आले आहेत. अर्थसंकल्प २०१६-१७ मध्ये गृनिर्माण विभागाची मूळ मागणी केवळ रु. ३६९ कोटी २१ लाखांची होती जी पुरवणी मागणीच्या तुलनेत केवळ २१.०९% होती.

# मागील ७ वर्षात जून-जुलै (पावसाळी) अधिवेशनात
# ७४ हजार ३५५ कोटींच्या पुरवणी मागण्या करण्यात आल्या
## मागील २ वर्षात २७ हजार ८२५ कोटींच्या पुरवणी मागण्या

*तक्ता. क्र. ६* *(रु. कोटीत)*




*स्त्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र- जून २०१० ते जुलै २०१६*

- वर्ष २०१०-११ ते २०१६-१७ या ७ वर्षाच्या कालावधीत ७४ हजार ३५५ कोटींच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या त्यापैकी आत्ताच्या युती शासनाच्या काळात म्हणजे मागील २ वर्षात २७ हजार ८२५ कोटींच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या आहेत.
- गेल्या ७ वर्षात सादर झालेल्या ७४ हजार ३५५ कोटींच्या पुरवणी मागण्यांमध्ये मागील २ वर्षाच्या पुरवणी मागण्यांचे प्रमाण (३७.४२%) आहे.
- वर्ष २०१०-११ ते २०१४-१५ या आघाडी शासनाच्या काळात सरासरी ९ हजार ३०६ कोटी रुपये पुरवणी मागण्यांद्वारे काढण्यात आलेत तर आत्ताच्या युती शासनाच्या काळात मागील २ वर्षात सरासरी १३ हजार ९१२ कोटी ५० लाख रुपये काढण्यात आले आहेत.

# चर्चेला असलेल्या विभागांसाठी बाबनिहाय मुद्दे

## २५ जुलै, २०१६

## कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग

## पूरक मागणी क्र.डी-३

## २४०१, पीक संवर्धन

बाब क्र.३९ : प्रधानमंत्री पीक विमा योजनांतर्गत विम्याच्या हप्त्यांसाठी ८०० कोटी रुपयांची तरतूद

- वर्ष २०१६-१७ च्या मूळ अर्थसंकल्पात या योजनेसाठी तरतूद करण्यात आली नव्हती मात्र नैसर्गिक आपत्ती व रोगांमुळे ज्यांच्या पिकांचे नुकसान झाले आहे अशा शेतकऱ्यांच्या लाभासाठी केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री पीक विमा योजनेची नवीन स्वरुपात अंमलबजावणी करण्यासाठी ८०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.
- शेतकऱ्यांसाठीच्या पीक कर्ज व्याज सवलत योजनेतील २० कोटी रुपयांचा परतावा अद्याप केंद्र व राज्य सरकारकडून मिळालेला नाही. सरकारकडून दोन-तीन वर्षाचे एकदम पैसे येत असल्याने विकास संस्था शेतकऱ्यांकडून व्याज वसूल करतात. त्यामुळे ही व्याज सवलत योजना शेतकऱ्यांसाठी 'असून अडचण अणि आणि नसून खोळंबा' अशीच झाली आहे. शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी काँग्रेस आघाडी सरकारने 'डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना' आणली मात्र मागील २ वर्षापासून शेतकऱ्यांना व्याज परताव्याचे पैसेच मिळालेले नाहीत. त्याचे कारण केंद्र व राज्य शासनाने मागील २ वर्षापासून केंद्र व राज्य सरकारकडून व्याजाचा परतावाच मिळत नसल्याने जिल्हा बँकेने विकास संस्थांच्या खात्यातून व्याज वसूल करण्यास सुरुवात केली आहे. शासन जर शेतकऱ्यांना 'पीक कर्ज व्याज सवलत योजनेसाठी' व्याज परताव्याचे पैसेच देणार नसेल तर नव-नवीन योजना आणून त्याचा उपयोग काय? या दिरंगाईला पूर्णपणे केंद्र व राज्य शासन जबाबदार असून शासन यावर कोणती कारवाई करणार आहे याविषयी कृषि मंत्र्यांनी सभागृहात निवेदन करावे.

## २४१५, कृषि विषयक संशोधन व शिक्षण
## महात्मा फुले कृषि विद्यापीठाला सहाय्यक अनुदान

बाब क्र. ४३: अहमदनगर जिल्ह्यातील हाळगाव, तालुका जामखेड, जिल्हा अहमदनगर येथे नवीन कृषि महाविद्यालय स्थापन करण्यासाठी ५ कोटी ३९ रुपयांची तरतूद करण्यात आली असून वर्ष २०१६-१७ साठी अनुदानातून भागविणे शक्य असून त्यासाठी १००० रुपयांची लाक्षणिक मागणी करण्यात आली आहे.

- महात्मा फुले कृषि विद्यापीठाला सहाय्यक अनुदान देण्यासाठी ५ कोटी रुपयांची तरतूद वर्ष २०१६-१७ च्या मुळ अर्थसंकल्पात करण्यात आली होती. या विद्यापीठाअंतर्गत नवीन कृषि विद्यालय स्थापन करण्यात येणार असले तरी आज राज्यात महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी १ हजार ६६९ पदे, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, परभणी १ हजार ४०७, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी तसेच डॉ. बाळासाहेब कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अशी एकूण ४ हजार ४४९ पदे रिक्त आहेत. कोणते पद भरायचे आणि कोणते नाही याचा निर्णय विद्यापीठ घेणार असले तरी अंतिम अंमलबजावणी मंत्रालय स्तरावर करणे गरजेचे आहे. मात्र ती होताना दिसत नाही. असे असताना नवीन कृषि महाविद्यालय स्थापन करून शासन काय करणार? हाच खरा प्रश्न आहे. तरी मान. कृषि मंत्री या रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कारवाई करणार आहेत?

## पूरक मागणी क्र. डी-६
## २४०५, मत्स्य व्यवसाय

बाब क्र. ४९: सागरी सुरक्षा रक्षक व वेगवान गस्ती नौका यासाठी ३ कोटी ३० लाख रुपयांची अतिरिक्त तरतूद.

- सागरी मत्सव्यवसाय या योजनेसाठी मूळ अर्थसंकल्पात २ कोटी ६५ लाख ४१ हजाराची तरतूद करण्यात आली होती त्यात पुरवणी मागणीद्वारे ३ कोटी ३० लाख रुपयांची अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. मात्र मुंबई शहराची सागर किनारपट्टी दहशतवादी संघटनांसाठी किती सहज उपलब्ध होऊ शकते याचा अनुभव 'सागर कवच' नावाखाली करण्यात आलेल्या रंगीत तालीमीत आला आहे. सागरी क़िनारपट्टीच्या सुरक्षेचा आढावा घेण्यासाठी वर्षातून दोन वेळा अशा प्रकारची रंगीत तालीम (मॉक ड्रिल) घेण्यात येते. मे महिन्याच्या १७ व १८ तारखेला अशा प्रकारची रंगीत तालीम घेण्यात आली होती. त्यात भारतीय किनारा रक्षक अधिकाऱ्यांनी रेड फोर्सचे (दहशतवादी) तर किनारा पोलिसांनी (ब्लू फोर्स) काम केले होते. किनारा पोलिसांची नजर चुकवून रेड फोर्सच्या जवानांनी पाच ठिकाणी घुसखोरी केली केवळ एका ठिकाणी सागरी

पोलिसांना भारतीय किनारा रक्षक अधिकाऱ्यांच्या रेड फोर्सला अडविण्यात यश आले. यातून सागरी पोलीस सागरीमार्गे येणाऱ्या दशहतवाद्यांना रोखण्यात किती अक्षम आहेत याचे दर्शन झाले.

- २६/११ सारखा भीषण हल्ला झाल्यानंतरही आपले समुद्र किनारे किती असुरक्षित आहेत हे लक्षात येते. किनारा रक्षकांना स्थानिक मच्छिमारांशी संघर्ष करावा लागतो, मच्छिमार समुद्रातील त्यांच्या हालचालींची माहिती देत नाहीत, शिवाय स्थानिक प्रशासनाकडूनही सहकार्य मिळत नाहीत असे अधिकारीच सांगतात. सागरी पोलिसांना वेगवान गस्ती नौका कशा चालवायच्या त्यांचे प्रशिक्षण दिले जात नाही. अनेक सागरी नौका वापराविना धूळ खात पडल्या आहेत यावर मागील काही वर्षांपूर्वी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (सीएजी) यांनी ताशेरे देखील ओढले होते. तरीही राज्य शासनाने त्यातून धडा घेतलेला नाही याचे हे ज्वलंत उदाहरणच म्हणता येईल. सागरी सुरक्षा हा विषय एवढा महत्त्वाचा बनलेला असताना प्रशासनाचे मात्र त्याकडे दुर्लक्षच होताना दिसत आहे.

## २६ जुलै, २०१६

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

### २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण

### (०२) शिष्यवृत्त्या व विद्यावेतने

बाब क्र.१४४: इयत्ता ८वी ते १०वीमध्ये शिकणाऱ्या विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील मुलींकरिता सावित्रीबाई फुले शिष्यवृत्तीसाठी १५ कोटी ९५ लाख रुपयांची अतिरिक्त तरतूद.

## तरतूद भरीव मात्र वितरण शुन्य, शिष्यवृत्तीची ही गंगाजळी नेमकी जाते कुठे?

- वर्ष २०१६-१७ मध्ये इयत्ता ८वी ते १०वी मध्ये शिकणाऱ्या विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील मुलींकरिता सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेसाठी मूळ अर्थसंकल्पात १५ कोटी ४५ लाख ८४ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली होती त्यापेक्षा जास्त तरतूद म्हणजे १५ कोटी ९५ लाख ३३ हजार रुपयांची तरतूद पुरवणी मागण्यांद्वारे पहिल्या तिमाहीत करण्यात आली आहे. मात्र राज्याच्या अर्थसंकल्पात अनुसूचित जातीच्या घटकांसाठी ११ हजार कोटी रुपयांची तरतूद सामाजिक न्याय विभागासाठी केली गेली असताना त्या खात्यातील अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे तब्बल १६०० कोटी रुपये वाया गेले आहेत.

त्यापैकी शिष्यवृत्तीसाठीच्या ७०० कोटींच्या निधीचे वितरण ही केले गेले नसल्याची संतापजनक बाब जून २०१६ मध्ये उघडकीस आली होती. यामुळे राज्यभरातील अमरावती, औरंगाबाद, लातूर, मुंबई, नागपूर, नाशिक व पुणे या विभागातील ८ लाख २० हजार मागास विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संपूर्ण प्रकरणाची चौकशीचे आदेश दिले होते त्या चौकशीचे काय झाले? त्याबाबत कोणत्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली? नसल्यास त्याची कारणे काय? सामाजिक न्याय विभागासाठी २०१५-१६ या आर्थिक वर्षात करण्यात आलेल्या ११ कोटींच्या तरतूदी पैकी ३० टक्के कट लावण्यात आली होती. या वर्षी सामाजिक न्याय विभागावर अन्याय होणार नाही यासाठी मान. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्र्यांनी काय कारवाई केली आहे.

| वर्ष संपले तरी शिष्यवृत्ती नाही<br>राज्य सरकारच्या ढिसाळपणामुळे पाच लाख विद्यार्थी प्रतिक्षेत | | |
|---|---|---|
| विभाग | एकूण अर्ज | प्रलंबित अर्ज |
| अमरावती | २ लाख ५५ हजार ७११ | ८२ हजार ७१९ |
| औरंगाबाद | १ लाख ७१ हजार ८१५ | ३६ हजार १८९ |
| लातूर | १ लाख १८ हजार ९३८ | २५ हजार ३१४ |
| मुंबई | १ लाख ६० हजार ९०३ | ३८ हजार २३४ |
| नागपूर | ३ लाख ६४ हजार ३१ | १ लाख ४१ हजार १८३ |
| नाशिक | ३ लाख ५ हजार ४३७ | ८४ हजार ९५९ |
| पुणे | २ लाख ९४ हजार ९०५ | ९० हजार ६४७ |

# गृहनिर्माण विभाग

## पूरक मागणी क्र. क्यू-३

## २२१६, गृहनिर्माण

बाब क्र.१६३ नागरी क्षेत्रामध्ये 'सर्वांसाठी घरे' या केंद्र पुरस्कृत योजनेसाठी केंद्राच्या हिश्श्यासाठी १ हजार ५० कोटी तर राज्य शासनाच्या हिश्श्यासाठी ७०० कोटी रुपये (४०टक्के) निधी उपलब्ध करून देण्याचे ठरविण्यात आले आहे.

## 'सर्वांसाठी घरे' योजनेसाठी सर्वाधिक तरतूद मात्र शासनाकडे योजनेचा बृहत आराखडाच नाही!

- या योजनेसाठी मूळ अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली नव्हती. प्रधान मंत्री आवास योजनेअंतर्गत परवडणाऱ्या घरांच्या प्रकल्पासाठी ९ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीला केंद्र शासनाने एप्रिल २०१६ मध्ये मान्यता दिली. या गुंतवणुकीतून महाराष्ट्र, पंजाब व जम्मू-काश्मीर या ३ राज्यात ७३ हजार २०५ परवडणारी घरे बांधली जाणार आहेत. त्यापैकी महाराष्ट्रात ७१ हजार ७०१ (९८टक्के) घरे बांधली जाणार आहेत. तर वर्ष २०२२ पर्यंत देशभरात २ कोटी परवडणारी घरे बांधली जाणार आहेत.
- आज मुंबईत रस्त्यावर राहणाऱ्या बेघर असणाऱ्या सन २०११ मध्ये झालेल्या जनगणनेत पालिकेच्या लेखी आकडेवारीत ५७ हजार बेघर लोकांची नोंद झाली आहे. मुंबईत एकल, कुटुंबे, वृद्ध, महिला, निराधार अशा विविध प्रकारचे बेघर आहेत यातील अनेक लोक ३० ते ७० वर्षांपासून रस्ते, फुटपाथवर राहत आहेत. ५७ हजार बेघरांपैकी केवळ २ ते ३ हजार बेघरांकडे सरकारी पुरावा आहे. त्यामुळे त्यांना कोणत्याही सरकारी योजनेचा लाभ घेता येत नाही. जगातील अनेक देशांमध्ये तेथील स्थानिक स्वराज्य संस्था बेघरांसाठी निवारे बांधून देतात. सामान्य नागरिकांना दिले जाणारे हक्क बेघरांनाही दिले जातात. मुंबईत बेघर म्हणजे भिकारी असे विचित्र मानसिकता तयार केलेल्या सरकारी यंत्रणांनी त्याच्या निवाऱ्याकडे विशेष लक्ष दिलेले नाही. यासाठी गृहनिमाण विभाग काय कारवाई करणार आहे? त्याबाबतचे निवेदन मान. गृहनिर्माण मंत्र्यांनी करावे. 'सर्वांसाठी घरे' या योजने अंतर्गत वर्ष २०२२ पर्यंत २२ लाख घरे महाराष्ट्रात बांधणार असे शासन म्हणते मात्र यासाठी जमिनीची उपलब्धता, रस्ते, वीज, पाणी या सर्व पायाभूत सुविधा कशा पुरविल्या जाणार याबाबत शासनाकडे नाही त्यामुळे नियोजना अभावी निधी वाया जाण्याची दाट शक्यता आहे.

# सार्वजनिक आरोग्य विभाग

## पूरक मागणी क्र. आर-१

## २२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य

बाब क्र.१७६ व १७८:राष्ट्रीय आरोग्य अभियान योजनांसाठी राज्य हिश्श्याकरिता ३५० कोटी रुपये व केंद्र हिश्श्याकरिता ४३५ कोटी २९ लाख ९६ हजार रुपयांची अतिरिक्त तरतूद.

- राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान गेली ११ वर्षे सुरू असूनही सुपरिणाम दिसत नाहीत. राज्यात २ हजार १२६ प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत. नियमानुसार या प्रत्येक केंद्रात एका महिलेसह ४ वैद्यकीय अधिकारी, २ आरोग्य सेविका, १ औषध निर्माण कर्मचारी व एक प्रयोगशाळा कर्मचारी असायला हवा. मात्र राज्यातल्या अनेक केंद्रात हे मनुष्यबळ नाही. १,५५८ केंद्रात केवळ २ वैद्यकीय अधिकारी आहेत. २५३ केंद्रात केवळ एकच वैद्यकीय अधिकारी आहेत. ६४४ केंद्रात प्रयोगशाळा तंत्रज्ञ नाही, १३४ केंद्रात औषध निर्माण कर्मचारी नाही, ५२७ केंद्रात एकही परिचारिका नाही, ९४ केंद्रात अधिसेविकाच नाही. राज्यातल्या २,१२६ केंद्रांपैकी केवळ ६८७ केंद्र २४ तास सुरू असतात. १,०५७ केंद्रे बाळंतपणाची केस आली की सुरू होतात व नंतर बंद केली जातात. राज्यातल्या ८४ केंद्रात व ३ हजार ४१८ उपकेंद्रात वीज पुरवठाच नाही. १,४८९ आरोग्य केंद्रात दूरध्वनीची सोय नाही. १४ ग्रामीण रुग्णालये व ५४८ प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रसुतीगृहच नाही. ६३ ग्रामीण व ५३० आरोग्य केंद्रात शस्त्रक्रिया कक्षच नाहीत. राज्यातल्या ३३१ केंद्रात पोहचण्यासाठी रस्ताच नाही. १४ ग्रामीण व ९६९ आरोग्य केंद्रात प्रयोगशाळाच नाही. सारे जग आज संगणकाने जोडले गेलेले असताना ३३३ केंद्रात संगणक नाहीत. १७५ ग्रामीण, ५८० आरोग्य केंद्रे व ४,३९३ उपकेंद्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी निवासस्थानेच नाहीत. ४१७ आरोग्य केंद्र व १३१ उपकेंद्रात रुग्णांना पुढील उपचारासाठी पाठविण्यासाठी कोणतीच सोय नाही. राज्यातील सर्वच्या सर्व म्हणजे २,१२६ आरोग्य केंद्र व १५० ग्रामीण रुग्णालयात क्ष-किरण यंत्राची सुविधा नाही आणि राज्यातील १३,६३७ उपकेंद्रांपैकी ५,०५१ उपकेंद्रात शुध्द पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध नाही.
- राज्यातील गोरगरीब वंचित, उपेक्षित जनता ज्या आरोग्य सेवेवर अवलंबून आहे त्या दुर्गम भागातील शासकीय आरोग्य सेवेचे हे भयावह चित्र आहे. हा अहवाल केंद्र शासनातर्फे १२ एप्रिल, २००५ पासून गेली ११ वर्षे देशभर सुरू असलेल्या राष्ट्रीय ग्रामीण अभियानाचे अंकेक्षण करण्यासाठी नेमलेल्या 'इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक ऑडिटर्स ऑफ इंडिया' या संस्थेने राज्यात केलेल्या पाहणीतून समोर आले आहे. तेव्हाच्या युपीए सरकारने

सुरू केलेली ही योजना नव्या मोदी सरकारनेही सुरू ठेवलेली आहे. या योजनेसाठी केंद्राकडून दरवर्षी मिळणारा कोट्यावधीचा निधी किती वाईट पद्धतीने खर्च केला जातो व प्रत्यक्षात गरिबांच्या पदरात या सेवेचे दान कसे पडत नाही. हे धगधगीत वास्तव या अहवालातून समोर आले आहे.

- 'इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक ऑडिटर्स ऑफ इंडिया' या दिल्लीच्या संस्थेने हा अहवाल तयार करताना वर्ष २०११ ते २०१३ या २ वर्षातील योजनेची अंमलबजावणी गृहीत धरली. संपूर्ण राज्याचे चित्र रेखाटताना नाशिक व गडचिरोली या दोन जिल्ह्यातील पाहणीचा आधार घेण्यात आला. ही योजना राबवताना आरोग्य खात्यातील अधिकाऱ्यांनी प्रचंड घोळ घातल्याचे या अंकेक्षणातून समोर आले आहे. या दोन वर्षात केंद्र शासनाने या योजनेसाठी राज्याला ३,४२८ कोटी रुपये दिले हा निधी ९७ टक्के खर्च झाला असे राज्याने वर्षाअखेरीस केंद्राला कळवून टाकले. प्रत्यक्षात तो खर्च झालाच नसल्याचे या पाहणीत दिसून आले.

- या योजनेच्या अंमलबजावणीत सामील असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी निधीतून अग्रीम म्हणून लाखो रुपये उचलले, त्याचा हिशेब सादर केलेला नसल्याचे पाहणीत आढळले. या योजनेचे लेखापरीक्षण जिल्हास्तरावर व्हावे, राज्य समितीने प्रत्येक जिल्ह्यातील कामाची नियमित पाहणी करावी असे निर्देश असताना अनेक जिल्ह्यात लेखापरीक्षकच नेमण्यात आले नाहीत. राज्य शासनाने सन २००७-०८ पासून १५ तर २०१२-१३ पासून २५ टक्के निधी या योजनेला देण्याचे ठरले. प्रत्यक्षात राज्याने कधीच हा निधी वेळेत दिलेला नाही. त्यामुळे आर्थिक मेळाचे गणित कधीच जुळून आले नाही असे या अहवालात म्हटले आहे. गेल्या ११ वर्षापासून दर वर्षी सरासरी २ हजार कोटी रुपये खर्च होऊन सुध्दा ग्रामीण भागातील आरोग्य सेवेची स्थिती सुधारण्याऐवजी चिंताजनक बनत चालली आहे. हे या अहवालामधून पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

- समर्थन संस्था व श्रमजीवी संघटना यांनी महाराष्ट्रात वर्ष २०१३ मध्ये त्यावेळचे विधानसभा सदस्य व लोकलेखा समिती सदस्य विवेक पंडित यांच्या समक्ष नाशिक ठाणे पुणे व रायगड जिल्ह्यांमध्ये दौरे करून आदिवासी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, व ग्रामीण रुग्णालयांचे पंचनामे केले असता दुरवस्था निदर्शनास आली होती व ती पुस्तिकेद्वारे शासनासमोर मांडण्याचा प्रयत्न देखील मार्च २०१३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात करण्यात आला होता.

- आज पुन्हा एकदा दिल्लीच्या 'इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक ऑडिटर्स ऑफ इंडिया' या संस्थेने मांडलेल्या अहवालाद्वारे संपूर्ण राज्याच्या आरोग्य संस्थांची रोगट प्रशासकीय व्यवस्था समोर आली आहे. सार्वजनिक आरोग्य मंत्री याबाबत कोणती कारवाई करणार आहे आणि राज्यातील ग्रामीण भागातील जनतेला न्याय मिळवून देणार आहे का? हा खरा प्रश्न आहे.

अंधेरीत सेव्हन हिल्स आणि ब्रम्हकुमारी रूग्णालयामध्ये राजीव गांधी जिवनदायी योजनेतील गरीब रूग्णांसाठी २० टक्के बेड उपलब्ध करून देण्यात आले नसल्याने प्रत्यक्ष भेटीत निदर्शनास आल्यानंतर सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची शिफारस अंदाज समितीने आपल्या अहवालात केली होती याबाबतचा शासनाचा **Acton Taken Report (ATR)** अद्याप प्रलंबीत आहे.

-दै.*महाराष्ट्र टाईम्स, दि. १६ एप्रिल २०१६*

मुंबई अहमदाबाद महामार्गावर वाढत्या अपघातामुळे डहाणूजवळ ‘ट्रॉमा सेंटर’ उभारण्याची अधिक गरज आहे. मात्र अद्यापही लाल फितीच्या कारभारात हे ‘ट्रॉमा सेंटर’च आज ट्रॉमा मध्ये आहे.

*-दै. सकाळ,द्वि. २८ जून, २०१६*

चंद्रपूर जिल्ह्याच्या जिल्हा आरोग्य विभागानुसार चंद्रपूर जिल्ह्यात २२ लाख ७१ हजार ६७६ इतक्या लोकसंख्येत ४६५ बालमृत्यू झाले आहेत. तर मेळघाटात केवळ २ तालुक्यातील २ लाख ९४ हजार १३७ लोकसंख्येमध्ये ४४६ बालमृत्यू झाले आहेत. मेळ घाटात बालमृत्यूचे प्रमाण चंद्रपूरच्या ४ पटीपेक्षा अधिक आहे. जिल्ह्याचा दर हजारी बाल मृत्यूदर ३.३२ आहे.

*-दै. लोकमत-दि. २० जुलै, २०१६*

# आदिवासी विकास विभाग

## पूरक मागणी क्रमांक टी-५

## २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग अल्पसंख्यांक यांचे कल्याण

बाब क्र. १९४: जनजाती उपयोजने अंतर्गत आश्रमशाळेमधील क्रीडा स्पर्धांचा खर्च भागविण्यासाठी ४ कोटी १७ लाख १९ हजार रुपयांची तरतूद.

- आदिवासी विकास विभागाच्या अनुदानित आश्रमशाळांचा बकालपणा आणि त्याच्या गुणवत्तेची ओरड होत असतानाच, खुद्द आदिवासी विभागाच्या आश्रमशाळांचीही दयनीय स्थिती समोर आली आहे. ५५२ पैकी २६६ शासकीय आश्रमशाळांना स्वत:च्या इमारती नाहीत. त्या शाळा पडक्या इमारतीत किंवा शेड मध्ये भरत असल्याचे आदिवासी विभागाच्याच सर्वेक्षणामध्ये उघड झाले आहे. महत्त्वाचे म्हणजे या संदर्भातील अहवाल शासनाकडे सोपवून ८ महिने झालेत तरी त्यावर काहीच कारवाई झालेली नाही. महाराष्ट्रात २००१ ते २०१५ या १५ वर्षाच्या कालावधीत १,०७७ आदिवासी बालकांचा मृत्यू झाल्याची केंद्र सरकारने कबुली दिली आहे.
- मान. उच्च न्यायालयानेही आश्रमशाळांमधील मुलांच्या मृत्यूच्या घटनानंतर शाळांची तपासणी करण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे शासनाने महसूल विभागाच्या पथकामामार्फत ऑगस्ट, २०१४ मध्ये शासकीय आश्रमशाळांची तपासणी केली नाशिक विभागात ९९ आश्रमशाळांना स्वत:च्या इमारती नाहीत. त्यापाठोपाठ ठाणे विभागात ७९ शाळा पडक्या इमारतीत भरतात, तर नागपूर, अमरावती व मराठवाड्यात ८८ आश्रमशाळा खुराड्यात भरतात. विशेष म्हणजे २६६ पैकी ४५ आश्रमशाळा उघड्यावरच भरत असून, मुलांना उन्हा-तान्हातच शिक्षण घ्यावे लागत. त्याशिवाय आदिवासी विभागाच्या ४८२ वसतिगृहांची क्षमता ४५ हजार मुलांची असली तरी त्यात आवश्यक सोयी सुविधांची वानवा आढळून आली आहे. सर्वच वसतिगृहांमध्ये पिण्याचे पाणी, पोषण आहार, स्वच्छता, मूलभूत सुविधा आदींचा अभाव आहे.
- वर्ष २००५ साली महाराष्ट्रातील आश्रमशाळा योजनेचा आढावा भारताच्या महालेखापरीक्षकांद्वारे घेण्यात आला होता. या अभ्यासासाठी वर्ष १९९९ ते २००४ हा कालखंड निवडण्यात आला होता. त्यामध्ये १८५ आश्रमशाळांच्या स्थितीचा आढावा घेण्यात आला होता. कॅगने अभ्यासलेल्या १८५ आश्रमशाळांपैकी ७८ आश्रमशाळांमध्ये वसतिगृहाची सोय नाही. मुले वर्गातच निवास करतात. ६४ शाळांमध्ये स्वच्छतागृहांची सोय नाही. ज्या आश्रमशाळांमध्ये वसतिगृहाची सोय आहे, अशा वसतिगृहातही विद्यार्थी जमिनीवरच झोपतात. ३८

शाळांमध्ये मेडिकल किट उपलब्ध नव्हते. वर्षातून ४ वेळा करावयची आरोग्य तपासणी एकदाही झालेली नव्हती. आश्रमशाळांमध्ये अग्निशमन यंत्रणा बसवावी, असा उच्च न्यायालयाचा आदेश आहे. तथापि समितीने अभ्यासलेल्या आश्रमशाळांपैकी १६२ आश्रमशाळांमध्ये अशी यंत्रणाच नाही. संगणक शिक्षण काळाची गरज असली तरी या शाळांमधील १,७९४ संगणक, २९९ प्रिंटर्स व २९९ टेबल असणे आवश्यक होते. त्यासाठी १० कोटी रुपयांचा निधी मंजूर असल्याचे आढळून आले. परंतु प्रत्यक्षात मात्र खर्चच झाला नव्हता. असा २००५ साली अहवाल देऊनही गेल्या १० वर्षात या परिस्थितीत कोणताच बदल झालेला नाही.

- वर्ष २००४ साली टाटा इन्स्टिटयूटने एक अभ्यास वर्ग नेमून सर्वेक्षण केले त्यामध्ये आश्रमशाळांमध्ये कर्मचाऱ्यांचा आदिवासी मुलांबाबत पूर्वग्रह दूषित दृष्टीकोन असतो. शिक्षण अर्धवट सोडून देण्यामागे विद्यार्थ्यांवरील शारीरिक, मानसिक अत्याचार हे दाहक कारण आहे. मुलांच्या आरोग्याची हेळसांड, त्यांच्या शिक्षणाच्या व्यतिरीक्त इतर समस्यांची फारशी जाणीव या कर्मचाऱ्यांना नसल्याचा निष्कर्ष निघाला होता.

- समर्थन संस्था व श्रमजीवी संघटना यांनी फेब्रुवारी-मार्च २०१३ मध्ये त्यावेळचे विधानसभा सदस्य व लोकलेखा समिती सदस्य विवेक पंडित यांच्या समक्ष नाशिक ठाणे पुणे व रायगड या ४ जिल्ह्यांमध्ये दौरे करून आदिवासी भागातील आश्रमशाळांचे पंचनामे केले. पंचनामे केलेल्या सर्वच आश्रमशाळांमध्ये वर्गखोल्या, भांडारगृह, स्वयंपाकगृह व धान्याची कोठारे अस्वच्छ होती तर धान्याचा दर्जा हा अतिशय निकृष्ट असल्याचे निदर्शनास आले. तर पंचनामे केलेल्या अनेक आश्रमशाळांमध्ये स्नानगृहे व शौचालये नसल्याने मुले व मुलींना देखील आंघोळीसाठी व इतर विधींसाठी बाहेर उघड्यावर, ओढ्यावर वा नदीवर जावे लागत होते. इतकी भीषण स्थिती असताना आदिवासींसाठी असलेल्या निधींसाठी कात्री लावली जाते व इतर विभागांकडे तो वळविला जातो. याबाबत आदिवासी विकास मंत्र्यांनी स्वतंत्र निवेदन करावे व महाराष्ट्रातील आश्रमशाळांची स्थिती सुधारावी म्हणून काय कारवाई केली जाणार आहे त्याची माहिती सदनाला द्यावी.

## २२३६, पोषण आहार

## (०१) (०७) भारत रत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना

बाब क्र. १९५: जनजाती क्षेत्र उपयोजनेअंतर्गत भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेसाठी ९२ लाख ८१ हजार रुपयांची तरतूद.

- वर्ष २०१६-१७ च्या मूळ अर्थसंकल्पात या योजनेसाठी तरतूद करण्यात आलेली नाही. या योजनेअंतर्गत गरोदर महिला व स्तनदा माता यांना पूरक पोषण आहार पुरविण्यासाठी १३,५९३ अंगणवाड्यांना प्रत्येकी २ गॅस सिलेंडर पुरविण्याकरिता अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

✍ कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी या योजनेअंतर्गत गरोदर महिलेला शेवटच्या तिमाहीत व स्तनदा मातांना बाळंतपणानंतर ३ महिने एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो. अनुसूचित क्षेत्रातील महिलांच्या आहारात उष्मांक व प्रथिनांची कमतरता असते. परिणामी कमी वजनाची बालके जन्माला येण्याचे प्रमाण अधिक असते. आदिवासी समाजात हे प्रमाण ३३.१ टक्के आहे. गरोदरपणाच्या शेवटच्या ३ महिन्यात आदिवासी स्त्रियांचे वजन वाढण्याचे प्रमाण कमी असते. त्याचा परिणाम जन्माला येणाऱ्या बालकावर होतो.

✍ माता बाल मृत्यू व कुपोषणाचे मुख्य कारणे सरकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी न होणे व आरोग्य सेवेचा लाभ स्थानिक जनतेपर्यंत न पोहोचणे हीच आहेत. मधल्या काळात कुपोषण निर्मूलनासाठी राज्यभर बालविकास केंद्रे सुरू करण्याचा निर्णय सरकारने घेतला होता. मात्र निधीच आला नसल्याने अनेक जिल्ह्यात ही केंद्र सुरू होऊ शकली नाहीत. याबाबत आदिवासी मंत्र्यांना श्रमजीवी संघटनेच्या माध्यमातून पालघर, ठाणे जिल्ह्यात घेराव घालण्याचा प्रयत्न झाला होता. वेळेवर ही केंद्रे सुरू न केल्यामुळे अनेक आदिवासी बालके दगावली गेलीत वा अतिकुपोषित झाली आहेत.

✍ अमृत आहार योजनेची स्थितीही वेगळी नाही. या योजनेअंतर्गत देण्यात येणारे पैसे अंगणवाडी सेविकांच्या खात्यात जमा झाले आहेत; मात्र या २५ रुपयांत चौरस आहार देणे शक्य नसल्याने या रकमेत वाढ करण्याची मागणी अंगणवाडी सेविका करीत आहेत, असे खुद्द बालविकास प्रकल्प अधिकारीच सांगतात. असे असताना आदिवासी विकासाचा निधी जातो कुठे? असा सवाल विचारत मान. उच्च न्यायालयाने सरकारला नुकतेच फटकारले आहे. राज्यातील अनेक भागांमध्ये कुपोषणाचा प्रश्न गंभीर आहे. अशा वेळी पोषणासाठी केलेल्या तरतूदींमध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत ६२ टक्के कपात करण्यात आली आहे. ही कपात एकात्मिक बालविकास प्रकल्पाच्या कार्यक्रमात करण्यात आली आहे. गेल्या वर्षी या योजनेसाठी ३ हजार ५६८ कोटी रुपयांची तरतूद होती यंदा ती केवळ १ हजार ३४० कोटी रुपयांवर आली आहे. याबाबत आदिवासी विकास मंत्र्यांनी सभागृहाला निवेदन द्यावे.

✍

## आदिवासी विकास विभागाच्या मंत्री सावरांना आवरा

आदिवासी आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांसाठी करण्यात आलेल्या २ लाख रेनकोट खरेदीत १२ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला असून रेनकोट पुरविण्यासाठी खोट्या नावाने निविदा दाखल झाल्या होत्या असे विरोधी पक्षाच्या नेत्यांनी पुरव्यानिशी सिद्ध केले आहे. त्यावर आदिवासी विकास मंत्र्यांनी खरेदीस विलंब का झाला याची खात्यामार्फत चौकशी करण्यात येत आहे, असे सांगितले त्यावर विरोधी पक्षाच्या नेत्यांनी चौकशी लाच प्रतिबंधक खाते किंवा विशेष चौकशी पथकाकडून करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

-दै.लोकमत, दि.२१ जुलै, २०१६

# महिला व बाल विकास विभाग

## पूरक मागणी क्र. एक्स-१

## २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण

बाब क्र.२१९, २२२ व २२३) तेजस्वीनी ग्रामीण महिला सक्षमीकरणासाठी १० कोटी, 'बेटी बचाव, बेटी पढाव' योजनेसाठी १२ लाख ५० हजार व 'माझी कन्या भाग्यश्री' या योजनेसाठी २५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

- वर्ष २०१६-१७ च्या मूळ अर्थसंकल्पात या योजनेसाठी केवळ १ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली होती मात्र आता पुरवणी मागणीद्वारे १० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तर 'बेटी बचाव, बेटी पढाव' या योजनेसाठी मूळ अर्थसंकल्पात ६ कोटी रुपये केवळ जाहिरात व प्रसिद्धीसाठी ठेवण्यात आले होते. बक्षिसांसाठी १ रुपयाही ठेवण्यात आला नव्हता. आता या योजनेच्या इतर उद्दिष्टांसाठी १२ लाख ५० हजार रुपये काढले जाणार आहेत. तर 'माझी कन्या भाग्यश्री' या योजनेसाठी मूळ अर्थसंकल्पात कोणत्याही प्रकारची तरतूद करण्यात आली नव्हती मात्र पुरवणी मागणीद्वारे यासाठी २५ कोटी रुपये काढण्यात आले असून जाहिरात व प्रसिद्धीसाठी यापैकी १० कोटी रक्कम खर्च होणार आहे. तर बक्षिसांसाठी १० कोटी खर्च केले जाणार आहेत.
- वर्ष २०१६-१७ च्या मूळ अर्थसंकल्पात पीडित महिला व बालक मनोधैर्य योजनेसाठी १५ कोटी ५७ लाख २२ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली होती. या योजनेअंतर्गत बलात्कार पीडित, ॲसिड हल्ला व बाललैंगिक अत्याचार पीडितांना १५ दिवसात अर्थसहाय्य देण्याचे २१ ऑक्टोबर २०१३च्या शासन निर्णयाद्वारे जाहीर केले असताना महिनोंमहिने देण्यात आलेले नाही. यावर दि. ८ जुलै २०१६ रोजी उच्च न्यायालयानेही आश्चर्य व्यक्त केले आहे. २ ऑक्टोबर २०१३ ते ३१ मार्च २०१६ या कालावधीत मंडळाकडे ४ हजार ८०९ प्रकरणाचे प्रस्ताव पाठविण्यात आले होते. त्यापैकी ३ हजार ७१४ प्रस्ताव मजूर झाले. व एकूण प्रस्तावांपैकी २ हजार ८१० पीडितांना अजूनही अर्थसहाय्य देण्यात आलेले नाही. त्यामुळे कोपर्डी सारख्या राज्यभरातील अनेक प्रकरणात पीडित व त्यांच्या पालकांचे मनोधैर्यच आता खचू लागले आहे यावर मान. महिला व बाल विकास मंत्री काय कारवाई करणार आहेत.

बलात्कार ॲसिड हल्ला व बाल लैंगिक अत्याचार पीडितांना तातडीने अर्थसहाय्य मिळावे व त्यांचे पुनर्वसन व्हावे या हेतून २१ ऑक्टोबर २०१३ रोजी पासून राज्यात 'मनोधैर्य योजना' सुरु झाली असून या योजने अंतर्गत एफ. आय. आर. ची माहिती मिळाल्या पासून एका आठवड्यात जिल्हा स्तरीय सहाय्य व पुनर्वसन मंडळाची बैठक घेऊन १५ दिवसाच्या आत २ ते ३ लाख रक्कम अदा करण्याचे म्हटले आहे. मात्र २ ओक्टोबर २०१३ ते ३१ मार्च २०१६ या काळात मंडळाकडे ४ हजार ८०९ प्रकरणांपैकी ३ हजार ७१४ प्रस्ताव मंजूर झाले असून अद्याप २ हजार ८१० प्रकरणात भरपाई देणे प्रलंबित असून याबाबत मान. उच्च न्यायालयाने राज्य शासनाला फटकारले आहे. कोपार्डीच्या दुर्दैवी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाचा हलगर्जीपणा अक्षम्य आहे

*-दै. महाराष्ट्र टाईम्स-दि.०९ जुलै, २०१६*

माटुंग्यातील बाल सुधारगृहात एका अल्पवयीन मुलाचा मृत्यू झाल्याचे तसेच एका १० वर्षाच्या मुलाचे १६ वर्षाच्या मुलाकडून लैंगिक शोषण झाल्याचे उघडकीस नुकतेच उघडकीस आले. या निमित्ताने बाल सुधारगृहामधील सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणिवर आला. बालगृहांच्या सुरक्षिततेबाबत शासनाने अद्याप कोणतेही पाऊल उचलले नसून दिवसेंदिवस बालगृहातील अत्याचाराचे प्रमाण वाढत आहे.

*-दै. महाराष्ट्र टाईम्स, दि. ५ जुलै, २०१६*